

आजचा दिनविशेष

१९९९ : आशा भोसले यांना गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार जाहीर.

दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार २९ सप्टेंबर २०२५ | अंक २७९ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# राज्यात पावसाचा हाहाकार, मराठवाड्याला झोडपलं, महाराष्ट्रात कुठे किती पाऊस?





## पावसाचा सर्वाधिक तडाखा हा मराठवाड्याला बसला आहे, तर उत्तर महाराष्ट्रात देखील अतिमुसळधार

महाराष्ट्राला पावसानं चांगलंच झोडपून काढलं आहे, पावसाचा सर्वाधिक तडाखा हा मराठवाड्याला बसला आहे. गेल्या काही दिवसांपासून मराठवाड्यात पावसाची संततधार सुरूच आहे. दरम्यान गेल्या 24 तासांपासून मराठवाड्यात पावसाचा जोर आणखी वाढला आहे. तर दुसरीकडे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रात देखील अतिमुसळधार पाऊस सुरु आहे. कोकण आणि मुंबईतही जोरदार पाऊस सुरू असून हवामान विभागाकडून हाय अलर्ट देण्यात आला आहे. जाणून घेऊयात राज्यातील पावसाची स्थिती. पश्चिम महाराष्ट्राला पावसाचा तडाखा पश्चिम महाराष्ट्रात देखील जोरदार पाऊस सुरू आहे. याचा सर्वाधिक फटका हा सोलापूर जिल्ह्याला बसला आहे, सोलापूर जिल्ह्यात पावसामुळे मोठं नुकसान झालं आहे. करमाळा तालुक्यातील मांगी तलाव ओव्हर फ्लो झाल्यानं शेकडो एकर जमीन पाण्याखाली गेली आहे. सातारा, सांगली आणि पुण्यामध्ये देखील जोरदार पाऊस सुरू आहे.दुसरीकडे अहिल्यानगर जिल्ह्यालाही पावसानं झोडपून काढलं आहे. जिल्ह्यात ढगफुटी सदृष्य पावसानं हाहाकार उडाला असून, पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. नागरिकांच्या घरात पाणी शिरलं आहे. या सर्व पार्श्वभूमीवर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी नुकसानग्रस्त स्थितीचा आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावली आहे. शिर्डीतील साई संस्थानच्या सभागृहात पालकमंत्री आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची ही बैठक पार पडली. नाशिकमध्येही पावसाचा जोर वाढला असून, गोदावरी नदीला पूर आला आहे.बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यात अतिमुसळधार पाऊस झाला असून, सावरगाव तेली गावाचा तालुक्याशी संपर्क तुटला आहे. परिसरातील संपूर्ण शेती पाण्याखाली गेली आहे. शेतकऱ्यांचं मोठे नुकसान झालं आहे. सावरगाव तेली गावाच्या चारही बाजूनं पाण्याचा वेढा आहे. एका बाजूने खडकपूर्णा नदीचा महापूर तर दुसऱ्या बाजूनी इतर नद्यांच्या पाण्याचा वेढा पडला आहे. सावरगाव तेली ते किनगाव जट्टू रस्त्यावरील पूलही पाण्याखाली गेला आहे.

मराठवाड्यात गेल्या 24 तासांपासून पावसाचा जोर वाढला आहे. पावसामुळे जायकवाडी धरणातून सुरू असलेल्या पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे, त्यामुळे गोदावरी नदीला पूर आला असून, नदी काठच्या गावांमध्ये पाणी शिरण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नदी काठच्या गावातील लोकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्यात येत आहे. मराठवाड्यातील जालना, धाराशिव आणि बीड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे प्रचंड नुकसान झालं आहे. अनेक गावाना पुराच्या पाण्याचा वेढा पडला आहे.

# सरपंचाने पुढाकार घेतल्याने पूल व रस्ता वाहून जाण्या पासून वाचवला

## मी जनतेचा सेवक आहे:- सरपंच अंबादास सांगळे

चकलांबा प्रतिनिधी:- चकलंबा परिसरात मागच्या आठवड्यात अतिदृष्टी मुळे सर्व तलाव शंभर टक्के भरले आहे. त्यात पुन्हा शुक्रवार व शनिवार त्या प्रमाणात मुसळधार पाऊस झाल्यामुळे चकलांबा गावचा अंबा तलाव आणि चोपण तलाव ओव्हरफुल झाल्यामुळे त्यामध्ये लाईटच्या तारा तुटल्या पोल पडले आता पूर व रस्ताही वाहून जाऊ लागला होता. सरपंचाला माहीत होतास त्यांनी लगेच तांड्यावरची टीम बोलून थोडासाही वेळ वाया न घालता पुढाकार घेऊन त्या रस्त्यावरील येणाऱ्या जाणाऱ्या साठी अडचण निर्माण होऊ देता तात्काळ काम सुरू केले. तलावाच्या साड्याचा पाण्याने हा पूल वाहून जाण्याच्या मार्गावर होता

हा रस्ता तांड्याला आणि चकलंबा येथील बऱ्याच लोकांची शेती आहे.

अंबादास सांगळे, ग्रामपंचायत सदस्य महादेव गाढे, राजेंद्र रामभाऊ सांगळे,युवा नेते विष्णू सुधाकर खेडकर, युवा नेते अविनाश सांगळे,सुभाष चव्हाण, नामदेव बाबुराव सांगळे काळुनाईक तांडा सरपंचाच्या टीमचे मनापासून आभार मानले जात आहे. सरपंच म्हणाले मी जनतेचा सेवक आहे कधीही मी तुमच्यासाठी तत्पर हजर आहे. सरपंचाने कोणतीही सरकारची मदत व पंचनाम्याची वाट न बघता आपल्या खिशातून मदत करणारा दिलदार माणूस बालानाईक तांड्याचे सरपंच अंबादास भाऊ सांगळे यांचे सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.



# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाचे जिल्हास्तरीय जलतरण क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश



माजलगाव प्रतिनिधी दिनांक 28/09/2025 येथील श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल बीड येथे संपन्न झालेल्या 19 वर्षांखालील जिल्हा स्तरीय जलतरण स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. यामध्ये 1.कृष्णा परसे - 100 मीटर बटरफ्लाय - प्रथम, 2.दीपक लकडे - 100मीटर बटर फ्लाय - द्वितीय, 3.ओंकार घटे - 200मीटर फ्रीस्टाईल - प्रथम, 200 मीटर बटरफ्लाय - प्रथम, 4. महारुद्र थोरात -200 मीटर फ्रीस्टाईल -द्वितीय, 200मीटर बटरफ्लाय -द्वितीय या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडा विभाग प्रमुख डॉ. उमेश साडेगावकर, प्रा. दिनेश गडदे यांनी मार्गदर्शन केले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे भा.शि. प्र. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, उपाध्यक्ष सौ. ज्योती ठाकूर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय सदस्य अमरनाथ खुर्पे, संकुलाचे पालक प्रकाश दुगड, स्थानिक अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, स्थानिक कार्यवाह ऍड. विश्वास जोशी, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, उपप्राचार्यडॉ. गजानन होंन्ना, डॉ. युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री, कार्यालय अधीक्षक श्री. विजय कुलकर्णी यांच्यासह सर्व प्राध्यापक व कर्मचारी वर्गाने अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## भारतीय राष्ट्रवाद पंडित दीनदयालजी उपाध्याय यांनी सामान्य लोकांमध्ये रुजवला -प्रा. राघवेंद्र मुळी.



माजलगाव प्रतिनिधी दिनांक २७/०९/२०२५ एकात्म मानवतावादाचे प्रणेते पंडित दीनदयालजी उपाध्याय यांची जयंती श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात साजरी करण्यात आली.याप्रसंगी घेण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी तर प्रमुख वक्ते प्रा. राघवेंद्र मुळी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे अभ्यास मंडळ व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ विभागाचे समन्वयक प्रा. डॉ. सुनील पाटील यांनी केले.

सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते पं. दीनदयालजी उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.विद्यार्थ्यांना म ार्गदर्शन करतांना प्रा.राघवेंद्र मुळी यांनी पंडित दीनदयालजी उपाध्याय यांच्या आयुष्यातील विविध प्रसंगावर प्रकाश टाकला. पंडितजी यांचे समाजाप्रती सम र्पण आणि त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी विविध प्रसंग त्यांनी यावेळी अधोरेखित केले. संघाच्या मुशीतून मि ळालेल्या संस्कारामुळे वसुधैव कुटुंबकम ही संकल्पना साकारण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. एकात्म मानवतावादाच्या माध्यमातून समाज कार्याला त्यांनी सुरुवात केली.अंत्योदय योजनेचे ते जनक होते.अंत्योदय योजनेच्या माध्यम ातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाची गंगा पोहोचली पाहिजे हे व्रत त्यांनी आजन्म अंगीकारले आणि त्याला मूर्त रूप देण्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत कार्य केले. विद्यार्थ्यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजातील वंचित,पीडित लोकांची भविष्यात आपल्या हातून सेवा घडावी यासाठी कार्य करावे असे त्यांनी शेवटी सांगितले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री, कार्यालय अधीक्षक श्री विजय कुलकर्णी यांची उपस्थिती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनील पाटील यांनी केले. मान्यवरांचे आभार डॉ. उमेश साडेगावकर यांनी मानले...............

# वाढदिवस साजरा न करता पुरग्रस्तांच्या मदतीला रोहितदादा पवार यांचा विधायक पुढाकार!

## रोहितदादांचा आदर्शवत निर्णय; कार्यकर्त्यांकडून पुरग्रस्तांना मदतीचा खरा साज

खर्डा ( प्रतिनिधी) प्रा. महेश बजगुडे

आमदार रोहितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी राज्यभरातील कार्यकर्ते विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करतात. मात्र यंदा अतिवृष्टीमुळे राज्यातील अनेक भागांत शेतकरी व नागरिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. हे लक्षात घेता, स्वत: आमदार रोहितदादा पवार यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले की, वाढदिवसानिमित्त कोणताही खर्च न करता तो निधी पुरग्रस्तांच्या मदतीसाठी वापरावा. या भावनिक आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत, आर. व्ही. पॉलिमर्सचे मालक विशाल



हांचे यांच्या वतीने व मैत्री ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष सागर गवसने मराठा यांच्या संकल्पनेतून खर्डा येथील पुरग्रस्त कुटुंबीयांना किराणा मालाचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे, धनेगाव येथे पूरग्रस्त झालेल्या



दोन घरांतील सर्व संसारोपयोगी साहित्य वाहून गेल्यानंतर, त्या कुटुंबीयांना तात्काळ रोख रक्कम देऊन मदतीचा हात देण्यात आला. विशेष म्हणजे, पावसाचा जोर कायम असतानाही कार्यकर्त्यांनी ही मदत घरपोच केली.

या मदत वाटप कार्यक्रमाचे वितरण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) चे जामखेड तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी खर्डा ग्रामपंचायत सदस्य प्रकाश गोलेकर, अक्षय सुर्वे, कांतिलाल आहेर, बबन सुर्वे, नितीन गोलेकर, बाबू चव्हाण, अमोल लोखंडे, बाळासाहेब काळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. ही मदत म्हणजे केवळ आर्थिक किंवा वस्तू स्वरूपातील नाही, तर मानवतेचा, आपुलकीचा आणि सामाजिक बांधिलकीचा खरा संदेश देणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २९ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### भारतातील प्रत्येक शहरात पेट्रोलचा दर वेगवेगळा का आहे? 'हे' आहे कारण



इंधनाच्या दरामुळे देशातील नागरिक हैराण झाले आहेत. पेट्रोलचे दर 110 रुपयांपर्यंत वाढले असल्याने सर्वसामान्य जनतेला आर्थिक तंगीचा सामना करावा लागत आहे. तुम्हाला कदाचित माहिती नसेल की देशभरातील प्रमुख शहरांमध्ये पेट्रोलचे दर हे वेगवेगळे आहेत. राजधानी दिल्लीत एक लिटर पेट्रोल 94.77 रुपयांना मिळते तर कोलकातामध्ये 105.41 रुपयांना मिळते. प्रत्येक राज्यामध्ये पेट्रोलचा दर वेगवेगळा असण्याचे कारण काय आहे? प्रश्नाचे उत्तर आज आपण जाणून घेणार आहोत. विशाखापट्टणममध्ये सर्वात जास्त तर दिल्लीत सर्वात कमी दर

आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणममध्ये सर्वात जास्त दराने पेट्रोल विकले जात आहे. येथे एक लिटर पेट्रोलची किंमत 109.04 प्रति लिटर आहे. तसेच हैदराबादमध्ये 107 रुपये प्रतिलिटर दराने पेट्रोल विकले जात आहे. राजधानी दिल्लीमध्ये पेट्रोलचा दर सर्वात कमी म्हणजे 94.77 रुपये प्रति लिटर आहे. तर दिल्लीत डिझेलची किंमत 87.62 रुपये प्रति लिटर आहे.

पेट्रोलच्या किमतींमागील कारण

तुमच्यापैकी अनेकांना वाटत असेल की पेट्रोल आणि डिझेलच्या किमती या आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या किमतीवर निश्चित केल्या जातात. मात्र असे नाही, भारतात प्रत्येक राज्य स्वतःचा व्हॅट, उत्पादन शुल्क आणि स्थानिक कर लादते, ज्यामुळे विविध राज्यांमध्ये इंधनाची किंमत वेगवेगळी असते. मे 2022 पासून केंद्र सरकारने आणि अनेक राज्यांनी कर कमी केले आहेत, मात्र त्यानंतरही इंधनाच्या दरात फारशी कपात झालेली नाही. जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती आणि परकीय चलन दर रोज सकाळी 6 वाजता जाहीर होतात. याचाही थोडाफार परिणाम इंधनाच्या दरावर होतो. मात्र स्थानिक करांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरील बदलांचा परिणाम कधीकधी उशिरा किंवा खूप कमी दिसून येतो. त्यामुळे इंधनाच्या दरात काही पैशांचा बदल होतो.

भारतात पेट्रोल महाग का आहे?

जगभरातील इंधनाच्या किंमती सतत बदललत असतात. इराणमध्ये पेट्रोल फक्त 2.4 प्रति लिटरने विकले जाते, तर हाँगकाँगमध्ये एक लिटर पेट्रोलचा दर 304 रुपये पर्यंत आहे. अमेरिकेतही, भारतापेक्षा पेट्रोल स्वस्त आहे; अमेरिकेत 80 रुपये प्रति लिटर दराने पेट्रोल मिळते. ही रक्कम भारतातील सरासरी किमतीपेक्षा 21 रुपयांनी कमी आहे. भारतात पेट्रोल महाग असण्याचे सर्वात मोठे कारण हे कर रचना आहे.

वेगवेगळे करभारतात केंद्र आणि राज्य सरकार पेट्रोलवर उत्पादन शुल्क आणि व्हॅट सारखे महत्त्वपूर्ण कर लावतात. यामुळे जागतिक बाजारात कच्चे तेल स्वस्त झाले तरी इंधनाच्या किमतीवर फारसा परिणाम होत नाही. तसेच डॉलरच्या तुलनेत रुपया कमकुवत झाल्यामुळे पेट्रोलच्या किमती वाढतात. तसेच पेट्रोल डीलर्सला देखील कमिशन द्यावे लागते, त्यामुळे भारतातील इंधनाच्या किंमती जास्त असतात.

# आष्टी पाटोदा शिरूर तालुक्याला ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना सरसकट मदत द्या.

## भाजपा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सुवर्णाताई लांबरुड यांची मागणी.

बीड प्रतिनिधी :-पाटोदा तालुक्यात सततच्या मुसळधार पावसाने सोयाबीन पिकांसह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून नदी काठच्या गावातील जमिनी पूर्णपणे पिकांसह खरडून गेल्या आहेत. त्यामुळे शासनाने तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून पंचनामे न करता सरसकट हेक्टरी सरसकट मदत द्यावी, तसेच मदतीचे निकष बाजुला ठेवावेत अशी मागणी भाजपाच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सुवर्णाताई लांबरुड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे केली आहे.



पाटोदा तालुक्यात दि २१पासुन सतत मुसळधार पाऊस पडत असून नदी, नाल्यांना पूर येत आहे. शेतात पावसाचे पाणी साचले असून नदीच्या पुराचे पाणी नदी काठच्या गावात आणि जमिनीत शिरले आहे. त्यामुळे नदी काठच्या जमिनी पिकांसह खरडून वाहून गेल्या आहेत. घरांचे नुकसान झाले असून जनावरे ही वाहून गेले आहेत. त्यामुळे पशुधनाची जीवीत हानी झाली आहे. काढणीला आलेले सोयबीन पीक पाणी साचल्याने जाग्यावर सडले असून पूर्णपणे हे पीक हातातून गेले आहे. तर कापुस पिकांचे बोंडे, पाते गळून पडली असून कांदा जाग्यावर सडला आहे. त्याचबरोबर बाजरी, उडीद, मुग ही पिके ही हातातून गेले असून ऊस पिकांच्या सऱ्यामध्ये पाणी साचले असून मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. भाजीपाल्याचे ही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सध्याच्या परिस्थितीत पाऊस थांबण्याचे नाव घेत नसून नद्या पाण्याने भरल्याने आता पात्र सोडून वाहत आहेत. तालुक्यातील प्रत्येक गाव अतिवृष्टीने बाधित झाले असून शासनाने कुठल्याही प्रकारचे पंचनामे न करता तात्काळ सर्व शेतकऱ्यांना नुकसानीचे मुल्यांकन करुन हेक्टरी सरसकटपणे अर्थिक मदत देण्यात यावी. तर वाहुन गेलेला संसार व घरे उभी करुन द्यावी. सध्याची परिस्थिती खूप भयानक झाली आहे फळबागा अनेक प्रकारच्या फळबागा या उपटुन पडल्या आहेत शेत तलाव विहीरी जमीनदोस्त झाल्या आहेत पुराच्या पाण्याने नदी काठाच्या जमिनी खरडून वाहून गेल्या आहेत आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील गावातील जमिनींना तळ्याचे स्वरूप आले आहे ओला दुष्काळ जाहीर करून ओल्या दुष्काळातील सर्व प्रकारच्या मदती शेतकऱ्यांना देण्यात याव्यात. अशी मागणी भाजपाच्या सुवर्णाताई लांबरुड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

# अनेक लोक सांगतात आमच्या कळणीत इतका पाऊस कधीच झाला नव्हता.

## मायबाप सरकार शेताला तलावाचे स्वरूप ; सरसकट मदत जाहीर करा..शिवसंग्राम

आज शिवसंग्राम पदाधिकारी यांनी चऱ्हाटा सर्कल व लिंबागणेश सर्कल मधील पाहणी दौरा केला . शेतकऱ्यांची प्रचंड बिकट अवस्था असून शेताला तलावाचे स्वरूप आले आहे . संपूर्ण पिके पाण्यात गेली असून घरामध्ये पाणी शिरले आहे . मागे काहीच शिल्लक नाही . नदी पात्रातील पाणी पातळी वाढल्याने नदी किनाऱ्यालगत एक किलोमीटर पर्यंत सर्व शेतात पाणी झाले आहे त्यामुळे शेतकरी अत्यंत बिकट कठीण परिस्थितीमध्ये सापडला आहे . अनेक लोक सांगतात आमच्या



कळणीत इतका पाऊस कधीच झाला नव्हता.. त्यामुळे मायबाप सरकारने पंचनामाच्या भानगडीत न पडता शेतकऱ्यांना सरसकट आणि तात्काळ मदत करावी अशी मागणी शिवसंग्रामच्या वतीने करण्यात येत आहे . याप्रसंगी आज दौऱ्यामध्ये सहभागी शिवसंग्राम तालुकाध्यक्ष पंडितराव माने , युवक जिल्हाध्यक्ष सुनीलराव कुटे , माजी पंचायत समिती सभापती ज्ञानेश्वर कोकाटे , शिवसंग्राम नेते लालाभाई , गणेश धोंडरे तसेच शेतकरी बांधव उपस्थित होते .

# अहमदपूर - अतिवृष्टीमुळे चिलखा येथील अडकलेल्या चार मजुराची सुखरूप सुटका

अहमदपूर प्रतिनिधी अतिवृष्टीमुळे अहमदपूर तालुक्यातील चिखला येथे चार मजूर अडकले होते. या घटनेची माहिती मिळताच तत्काळ जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्याशी संपर्क करून एनडीआरएफ यांची टीम त्या ठिकाणी रवाना केली. यामध्ये स्वतः चिलखा येथे जाऊन ते मजूर सुखरूप बाहेर निघेपर्यंत



उपस्थित होतो. पहाटे पाच पासून अडकलेल्या मजुराची प्रशासनाच्या मदतीने सुखरूप सुटका केली. यावेळीसहकार मंत्री बाबासाहेब पाटील उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार उज्वला पांगरकर, पोलीस निरीक्षक भुसनर सह विविध प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

# दबंग सरपंच किशोर नागरगोजे यांची शानदार कामगिरी

# नदी पात्रात उतरुन गावकऱ्यांची विद्युत सेवा केली सुरळीत

पाटोदा (प्रतिनिधी) पाटोद्यात अतिवृष्टीमुळे पूराचा प्रचंड तांडव सुरु असताना येवलवाडी गावावर मोठा संकटाचा डोंगर कोसळला. विजेच्या तारांवर पूरामुळे झाड कोसळल्याने संपूर्ण गाव आठ दिवस संपूर्ण अंधारात बुडाले.आठ दिवस ज्या आठ दिवसांत विद्यार्थी शाळेत शिक्षण घेऊ शकले नाहीत, शेतकरी शेतात काम करू शकले नाहीत, आणि महिलांना घरगुती कामं करणे खूपच अवघड झाले. या काळोखामुळे फक्त येवलवाडीच नव्हे, तर आसपासच्या चार ते पाच गावांमध्येही अंधार पसरला होता.संकटाच्या या कठीण वेळेस सरपंच किशोर नागरगोजे यांनी "गावासाठी धोका पत्करणे गरजेचे आहे" असे ठरवून धाडसी पाऊल उचलले. त्यांनी गावकऱ्यांना एकत्र



केले आणि सर्वांनी मिळून नदीच्या पत्रात उतरून झाड तोडण्याचे कठीण आणि धोकादायक काम हाती घेतले. वाहणाऱ्या पाण्याचा प्रचंड प्रवाह आणि जीविताला धोका असतानाही सरपंच आणि गावकरी आपापल्या धैर्याचे आणि निष्ठेचे प्रदर्शन करत होते.गावकरी आणि सरपंचांनी एकजुटीने केलेल्या प्रयत्नांमुळे अखेर विजेच्या तारांवर अडथळा निर्माण करणारे झाड यशस्वीरित्या काढले गेले. विजेची सेवा पुन्हा सुरळीत झाली आणि संपूर्ण येवलवाडी गाव उजेडात न्हालाले. तसेच, या धाडसामुळे आसपासच्या चार ते पाच गावांमध्येही प्रकाश परत आला, जीवन पुन्हा सुरळीत झाले. यामुळे गावकऱ्यांनी आनंदात जल्लोष केला. मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत प्रत्येकजण सरपंचांच्या धाडसाचे आणि तत्परतेचे कौतुक करत होते सरपंच किशोर नागरगोजे यांनी दाखवलेले धैर्य, संकटावर मात करण्याची तयारी, आणि जनहितासाठी असलेली निष्ठा आज संपूर्ण परिसरात आदर्श ठरत आहे. संकटसमयी गावकऱ्यांसोबत हातमिळवणी करत करून केलेले काम आणि संकटावर मात करण्याची त्यांची धडपड हे येवलवाडीच्या इतिहासात नेहमी स्मरणात राहणार आहे.या घटनाक्रमामुळे नागरिकांमध्ये जनसेवेच्या मूल्याची जाणीव जागृत झाली आहे. सरपंच नागरगोजे हे फक्त नेतेच नाहीत, तर संकटात उभे राहणारे, धाडसी आणि निष्ठावंत नेतृत्वाचे प्रतीक ठरले आहेत.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

रवीवार २८ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



## LIC ची ही योजनाच लय भारी, 150 रुपयांच्या बचतीने लाखो रुपयांची बेगमी...




जर तुम्हाला तुमच्या मुलांच्या भविष्याची चिंता लागली आहे का ? मुलांसाठी सुरक्षित, भरोसेमंद आणि फायदेमंद गुंतवणूकीचा पर्याय शोधत असाल तर आता पोस्ट ऑफीस वा एफडीत पैसा घालण्याची काही गरज नाही. LIC चा “न्यू चिल्ड्रन मनी बॅक प्लान” तुमच्यासाठी चांगला स्मार्ट पर्याय आहे. या योजनेत रोज केवळ 150 रुपयांच्या बचतीने मुलांसाठी 19 लाख रुपयांचा फंड बनवू शकता. हा पैसा मुलांच्या शिक्षणासाठी, लग्नासाठी वा कोणत्याही मोठ्या खर्चासाठी वापरु शकता.

काय आहे LIC न्यू चिल्ड्रन मनी बॅक प्लान?

ही योजना खास करुन लहान मुलांच्या भविष्याचा विचार करुन ही योजना तयार केली आहे. या प्लानमध्ये आई-वडील आपल्या 0 ते 12 वर्षांच्या मुलांच्या नावाने गुंतवणूक सुरु करु शकतो. हा एक नॉन – लिंक्ड, पार्टीसिपेटिंग इंश्योरन्स प्लान आहे. ज्यात जोखीम कव्हरेजसह गुंतवणूकीवर रिटर्न आणि बोनस देखील मिळतो. या योजनेची खास बाब म्हणजे यात मनी बॅकची सुविधा आहे.म्हणजे मुलांचे वय जसे वाढत असते तर काही ठराविक वयापर्यंत तुम्हाला गुंतवणूकीची रक्कम मिळत रहाते. कसा होणार 19 लाखांचा फंड ?

जर तुम्ही रोज 150 रुपये वाचवता, तर महिन्याला 4,500 रुपये जमा होतील, वर्षाला ही रक्कम 54,000 रुपयांच्या आसपास होते. जर तुम्ही सतत 25 वर्षे गुंतवणूक केली तर ही रक्कम सुमारे 14 लाख रुपये होते. या शिवाय LIC या प्लानवर बोनस आणि रिटर्न देखील देते.ज्यामुळे पॉलीसीची मॅच्युरिटीवर एकूण फंड वाढून सुमारे 19 लाख रुपये होऊ शकते.ही रक्कम मुलांच्या उच्च शिक्षणावर आणि परदेशी शिक्षणावर मोठ्या प्रमाणावर खर्च करता येऊ शकते. कसा आणि केव्हा मिळतो पैसा ?

या प्लानची सर्वात खास बाब म्हणजे याची मनी बॅक सिस्टीम. जेव्हा मुलगा किंवा मुलगी 18, 20, 22 आणि 25 वर्षांची होईल.तेव्हा त्यातील सम एश्योर्ड ( म्हणजे विमा रक्कम ) चा एक हिस्सा मिळणे सुरु होते. 18, 20 आणि 22 वर्षाच्या वयात तुम्हाला विमा रकमेचा 20-20% पैसा परत मिळतो. तर 25 वर्षांत उरलेल्या 40% सह बोनस देखील दिला जातो.या प्रकारे मुलाची प्रत्येक गरजेच्या वेळी वेळोवेळी तुम्हाला आर्थिक मदत मिळत जाते.

हप्ता भरणे सुद्धा सोपे

या योजनेची आणखी एक मोठी गोष्ट म्हणजे या हप्ता भरण्यासाठी फ्लेक्सिबिलिटी मिळते. तुम्ही हवे तर मासिक, त्रैमासिक, सहामाही किवा वार्षिक अशा प्रकारे तुमच्या सोयीने हप्ते भरु शकता. त्यामुळे तुमच्या बजेटप्रमाणे हप्ता भरता येतो.

# एस पी साहेब बीड जिल्ह्यातील गुंडागिरीचे समीकरण कधी बदलणार का दिवसान दिवस गुंडागर्दी चे समीकरण चालू राहणार का?

**एस पी साहेब बीड जिल्ह्यामध्ये प्रत्येक पोलीस स्टेशन मध्ये पोलीस प्रशासकीय कर्तव्य बजवणारे जे पोलीस कर्मचारी अधिकारी आहेत. हे सर्व बीड जिल्ह्यातील असल्यामुळे बीड जिल्ह्यातील गुंडांना खत पाणी देण्याचे काम हे आपले कर्मचारी करीत असल्याचे चर्चा सध्या बीड जिल्ह्यामध्ये रंगत आहे. म्हणून यांची बीड जिल्हा अंतर्गत बदली न करता बाहेर जिल्ह्यामध्ये नागपूर, गडचिरोली, खानदेश गोंदिया या सारख्या जिल्ह्यामध्ये त्यांना पाठवा जेणेकरून बीड जिल्ह्यामध्ये नवीन पोलीस कर्मचारी अधिकारी आणा जेणेकरून बीड जिल्ह्यामध्ये कायदा व सुव्यवस्था व शांतता निर्माण होईल असे देखील सर्व बीड जिल्ह्यातील नागरिकांमधून बोलले जात आहे .जसे एल. सी. बी. विभागातील सर्वच कर्मचारी बदलून नवीन कर्मचारी घेतले त्यामुळे हप्ताखोरी ला आळा बसला. आता सर्वच बीड जिल्ह्यातील पोलीस कर्मचारी बाहेर च्या जिल्ह्यात टाका बीडला बाहेरील जिल्ह्यातून पोलीस आना तरच गुंडाराज कमी होईल.**

**बीड जिल्ह्यामध्ये लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ मानल्या जाणाऱ्या एका पत्रकाराच्या मुलाची हत्या होते, एस पी साहेब बीड जिल्ह्यामध्ये कुठेतरी कायदा व सुव्यवस्था शिल्लक आहे का? तुम्हीच सांगा व सर्वसामान्य माणसाचे काय हाल होत असतील या गुंडागर्दीमुळे हे देव जाणो**

बीड प्रतिनिधी. बीड जिल्ह्यामध्ये सध्या कायदा व सुव्यवस्था चे तीन तेरा वाजले असून चिंधाडया उडवल्या जात आहेत. गुंडांकडून हे मात्र दिवसान दिवस सध्या बीड जिल्ह्यामध्ये पाहावयास मिळत आहे. एसपी नवनीत कावंत साहेब यांचे कर्तव्य अतिशय चांगल्या प्रकारे आहे, परंतु त्यांच्या खालची जी त्यांची पोलीस यंत्रणा आहे. ती मात्र कुठेतरी कमी पडत आहेत.कायदा व सुव्यवस्थेचा धाक दाखवण्यामध्ये ते व्यवस्थित काम करत नसल्यामुळे हे सर्व प्रकार घडत असल्याचे बीड जिल्ह्यातील नागरिककामधून बोलले जात आहे.लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ मानल्या जाणाऱ्या एका उत्कृष्ट सुसंस्कृत पत्रकाराच्या मुलाची हत्या पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या अवघ्या 500 मीटर अंतराच्या ठिकाणी होते, हे पोलीस प्रशासनाचे दुर्दैव आहे. हत्या करून हत्यारे फरार झाल्यानंतर एक अर्धा तास त्या ठिकाणी हल्ला झालेल्या व्यक्तीला त्या ठिकाणी पडावं लागतं ते दुर्दैव आहे. त्याच्यानंतर पोलीस येतात आणि उचलतात तोपर्यंत जीव गेलेला असतो. हे मात्र अतिशय कठीण आणि गंभीर दुर्दैव आहे. बीड जिल्ह्याचे दैनिक बीड सिटीजनचे सहाय्यक संपादक देवेंद्रजी ढाका यांच्या मुलाची निर्गुण हत्या करण्यात आली. या हत्याच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील तमाम पत्रकार बांधवांमधून असंतोष निर्माण झाला आहे. जे कोणी हत्यारे हत्या करणारे असतील त्यांना तात्काळ जेरबंद करून त्यांच्यावर कायदेशीर कडक कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी कुठल्याही राजकीय दबाव तंत्रा चा पोलीस अधीक्षक साहेब आपल्यावर परिणाम पडणार नाहीत हे देखील सत्य आहे. कारण आपण चांगले काम करत आहात. परंतु आपली यंत्रणा कुठेतरी कमी पडत आहे. म्हणून आपण आपल्या पोलीस यंत्रणेला कडक आदेश देऊन तात्काळ स्व.यश ढाका यांच्या हत्यारेला पकडून तात्काळ जेलमध्ये टाका असे बीड जिल्ह्यातील तमाम पत्रकार व विविध दैनिकाचे संपादक बांधवांच्या वतीने जि पोलीस अधीक्षक नवनीत कांवत साहेब यांना विनंती करण्यात येत आहे. जर तात्काळ या आरोपींना अटक नाही झाली तर लोकशाही मार्गाने सर्व पत्रकार एस पी साहेब रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाहीत. याची देखील आपण दक्षता घ्यावी, कारण बीड जिल्ह्यामध्ये कायदा व सुव्यवस्था चे समीकरण शिल्लक राहिलेले कुठे दिसत नाही. सर्व गुंडागिरीचे समीकरण चाललेले आहे जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी घरफोडया दरोडे खून बलात्कार अशा मोठ्या मोठ्या घटना घडत आहेत यामध्ये आपले पोलीस प्रशासन नक्कीच कुठेतरी कमी पडत असल्याचे सध्या दिसून येत आहे. आपले काम अतिशय दर्जेदार आणि उत्कृष्ट पद्धतीचे आहे. परंतु आपल्या खालची यंत्रणा जी आहे ती पोलीस यंत्रणा बरोबर कर्तव्य बजावत नसल्याचे सध्या दिसून येत आहे. आपण याच्याकडे लक्ष देणे देखील गरजेचे आहे. जेणेकरून बीड जिल्ह्यामध्ये कायदा व सुव्यवस्था चे समीकरण अबाधित राहील आणि सर्व लोक गुनाने व गोविंदाने नांदतील याची दक्षता ही आपण घ्यावी.

# अर्धापूर तालुक्यात पावसाचा हाहाकार, शेतात पाणीच पाणी, नदी-नाल्यांना महापूर

## तीन जनावरे दगावली,शेकडो घरात गेले पाणी,सर्वत्र शेती जलमय



**शेलगांव,सांगवी-खडकी,देळूब,देगांवकुहाडा,कोंढा,भोगांव,मेंढला,गणपूर, सावरगाव यासह अनेक गावांचा तालुक्याशी संपर्क तुटला**

अर्धापूर :- उध्दव सरोदे - अर्धापूर तालुक्यात यापूर्वीही महिना भरापासून व ता.२७ शनिवारी रात्री पासून दिवसभर सतत पडणाऱ्या मुसळधार पावसाने शेतीचे अतोनात नुकसान केले.या पावसामुळे तालुक्यातील सर्वच नदी नाल्यांना महापूर आला आहे.३ जनावरे दगावली असून शेकडो घरात पाणी शिरल्याने घरातील संसार उपयोगी सर्व साहित्य खराब झाले आहे. पुराच्या पाण्याने शेलगांव,सांगवी, खडकी,देळूब,देगांव कु-हाडा,कोंढा, भोगांव,मेंढला,गणपूर,सावरगाव, यासह अनेक गावांचा तालुक्याशी संपर्क तुटला आहे अशी माहिती अर्धापूरचे तहसीलदार रेणूकादास देवणीकर यांनी आमच्या दैनिकाशी बोलतांना दिली आहे.अर्धापूर तालुक्यातील सर्वच शेती अतिवृष्टीमुळे व पूरपरिस्थितीने जलमय झाली आहे.शेतातील काळी माती वाहून गेली आणि जमिनी खरडून गेल्या असून शेतकऱ्यांचे यामुळे पुर्णपणे अतोनात नुकसान झालेले आहे. सर्वच पिके पाण्याखाली गेली आणि नदी नाल्यांना जागोजागी महापूर आला आहे.पुराच्या पाण्यासह शेतकऱ्यांचे स्वप्न पण पुर्णपणे वाहून गेली आहेत.सोयाबीन,कापूस,उडीद, मूग,तुर,हळद,केळी,पपई,ऊस यासह अन्य पिकांचे पुर्णपणे अतोनात नुकसान झाले आहे.शेतात तर पिक दिसतच नाही तर सर्वत्र पाणीच पाणी दिसत आहे.शेतीला समुद्राचे स्वरूप आले असून शेती कुठे आहे हेच दिसत नाही.फक्त जिकडे तिकडे पाणीच पाणी दिसत आहे.मागील व आताच्या या महाभयंकर नुकसानी बाबत शासनाने ताबडतोब नाराज,दुःखी व उपाशी शेतकरी आणि जनतेला मदत करून आधार द्यावा अशी मागणी शेतकरी व जनतेतून होत आहे.

# बीड शहर हद्दीतील हॉटेल, टपरी चालकांना पोलिस निरीक्षक बल्लाळ यांनी केल्या सूचना

बीड (प्रतिनिधी) : बीड शहरात दिवसेंदिवस गुन्हेगारीच्या प्रमाणात वाढ होत असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी याकरिता बीड पोलीस प्रशासन तत्पर आहे. सध्या बीड शहरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असून ते नियंत्रणात आणण्यासाठी पोलिस अधीक्षक नवनीत कावंत व पोलीस उप अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहर पोलीस निरीक्षक बल्लाळ यांनी आज सकाळी बीड शहर हद्दीतील हॉटेल व टपरी चालकांना ठाण्यात बोलावून नियमांचे पालन करण्या बाबत महत्त्वाचया सूचना केल्या जसे की हॉटेल किंवा पान टपरी रात्री ठरवून दिलेल्या वेळेतच बंद करणे गुटखाबंदी असल्याने गुटखा विक्री करू नये जर कुठ काही संशयास्पद हालचाल दिसली तर पोलिसांना त्या बाबत माहिती देणे या पुढे नियमाचे उल्लंघन करणाऱ्या विरोधात कडक कारवाई करण्यात येईल इत्यादी आवश्यक सूचना देण्यात आल्या असून यावेळी शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. हॉटेल, टपरी, कॉफी शॉप, बिर्याणी हाऊस हे वेळेतच बंद करावे अन्यथा कारवाई करण्यात येईल असे शहर पोलिस पो.नि. बल्लाळ यांनी केल्या. यावेळी पोलीस कर्मचारी सय्यद शहेंशाह यांच्यासह काही सामाजिक कार्यकर्ते देखील यावेळी उपस्थित होते.

**हॉटेल, कॉफी शॉप, टपरी वेळेतच बंद करा, अन्यथा कारवाई - पो. नि. शीतलकुमार बल्लाळ**



# राज्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा, मुख्यमंत्री फडणवीसांची मोठी घोषणा

महाराष्ट्रात पावसामुळे हाहाकार उडाला आहे, राज्याला पावसानं झोडपून काढलं आहे. पावसामुळे शेतकऱ्यांचं अतिप्रचंड नुकसान झालं आहे. पीक तर पुराच्या पाण्यात वाहून गेलंच पण सोबतच शेतातील मातीसुद्धा वाहून गेली आहे. ऐन हाततोंडाशी आलेला घास पावसानं हिरावून घेतल्यानं शेतकरी हातबल झाले आहेत. आता काय करायचं असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर आहे.

अनेक गावांना पुराच्या पाण्याचा तडाखा बसला आहे. नद्यांना आलेल्या पुरामुळे राज्यातील अनेक गावांचा सर्पंक तुटला आहे. घरादारात पाणी शिरल्यानं संसारोपयोगी साहित्य देखील वाहून गेल्यानं नागरिक रस्त्यावर आले आहेत. शेतीसोबतच घरादाराचं देखील मोठं नुकसान झालं आहे. दरम्यान आता नुकसानग्रस्तांचे डोळे सरकारच्या मदतीकडे लागले आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा केली आहे. पावसाचा सर्वाधिक तडाखा हा मराठवाड्याला बसला आहे. आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी औसा तालुक्यातील उजणी आणि निलंगा तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकासानाची पहाणी केली, यावेळी बोलताना त्यांनी मोठी घोषणा केली आहे. सर्व निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना सरसकट मदत करणार आहोत, कुठेही अधिकचे निकष न लावता आणि आवश्यकता असेल तर निकष शिथिल करून सरकारला नागरिक





केंद्रीत मदत करायची आहे. ऑलरेडी आम्ही पैसे रीलीज करायला सुरुवात केली आहे. नुकसानग्रस्तांच्या मदतीसाठी 2 हजार 200 कोटींचा पहिला हप्ता मंजूर झाला आहे. दिवाळीपूर्वीच सर्व शेतकऱ्यांना मदत मिळेल असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी म्हटलं आहे, यामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात आता दिलासा मिळण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात सर्वाधिक नुकसान

दरम्यान यंदा राज्यातील मराठवाड्यात पावसामुळे सर्वाधिक नुकसान झालं आहे. मराठवाड्यात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरूच आहे, पावसामुळे उभी पिकं पाण्याखाली गेली असून, शेतीचंही प्रचंड नुकसान झालं आहे. अनेक नद्यांना पूर आल्यानं पुराचं पाणी गावात शिरल्याचं चित्र आहे, काही ठिकाणी गावाला पुराचा वेढा पडल्यानं नागरिक गावात अडकले आहेत. पुरात अडकलेल्या नागरिकांसाठी बचाव आणि मदत कार्य युद्धपातळीवर राबवण्यात येत आहे.

## कोचिंग क्लासेस आणि महाविद्यालयाजवळील टपऱ्यांची तपासणी करून बंद कराव्यात - मनसेचे जिल्हा सचिव सोमेश कदम यांचे मागणीपत्र

बीड (प्रतिनिधी):-बीड शहरातील महाविद्यालये व कोचिंग क्लासेसच्या परिसरात उभारण्यात आलेल्या टपऱ्यांवरून तरुणांमध्ये नशेचं प्रमाण वाढत असून, त्यातून गुन्हेगारीला खतपाणी मिळत असल्याचा आरोप करत मनसेचे जिल्हा सचिव सोमेश कदम यांनी संबंधित टपऱ्यांची शासन स्तरावरून पडताळणी करून बंद करण्याची मागणी केली आहे.

या संदर्भात सोमेश कदम यांनी प्रेस नोटद्वारे अशी माहिती दिली आहे की, शहरातील अनेक टपऱ्यांवर फुलचंद पानासारखे पदार्थ सहज उपलब्ध आहेत. याचा गैरफायदा घेऊन अनेक तरुण नशेच्या आहारी जात आहेत. नशा मेंदूवर ताबा मिळवते आणि मग तीच मुले टोकाची भूमिका घेऊ लागतात. यामुळे गेल्या काही महिन्यांत शहरात खुनाच्या घटनांत कमालीची वाढ झाली आहे. त्यामुळे शहरातील महाविद्यालये, कोचिंग क्लासेस आणि शिक्षणसंस्था परिसरातील अशा टपऱ्यांची सखोल तपासणी करून त्यांच्यावर कारवाई



करावी, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्याचे सांगितले आहे. तसेच, बीड शहरात रात्री उशिरा १ वाजेपर्यंत तरुण मोबाईलवर गेम खेळत बसलेले अनेक भागांत आढळतात. अशा ठिकाणी किरकोळ कारणांवरून विवाद आणि भांडणे होण्याची शक्यता असून, पोलिसांनी अशा ठिकाणी गस्त वाढवून कारवाई करावी, अशी अतिरिक्त मागणीही सोमेश कदम यांनी केली आहे.

## कै.प्रल्हाद शिंदे यांचे निधन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड:लोहा तालुक्यातील उमरा येथील कै. प्रल्हाद चंपती शिंदे वय ४५ वर्षे यांचे दि.२८-सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी २ वाजता दुःखद निधन झाले असून



त्यांच्या पार्थिवावर रात्री १० वाजता उमरा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. कै. प्रल्हाद शिंदे यांचे पश्चात आई वडील पत्नी एक मुलगा एक मुलगी भाऊ असा परिवार आहे.

## अर्चना कुटेच्या पोलीस कोठडीत वाढ!



बीड - प्रतिनिधी ज्ञानराधा मल्टीस्टेट घोटाळ्यात अटक करण्यात आलेल्या अर्चना कुटे यांच्या पोलीस कोठडीत दिन दिवसांची वाढ करण्यात आली आहे. जानेवारी २०२४ मध्ये बीड येथील ज्ञानराधा मल्टीस्टेट मध्ये हजारो कोटींचा घोटाळा उघडकीस आला. सुरेश कुटे, आशिष पाटोदेकर यांच्यासह उपाध्यक्ष यशवंत कुलकर्णी यांना त्यावेळी अटक करण्यात आली होती. मात्र त्यावेळी पुण्यातून सुरेश कुटे यांच्यासोबत बीडच्या एसपी ऑफिस मध्ये आणण्यात आलेल्या अर्चना कुटे यांना सोडून देण्यात आले होते.दरम्यान तब्बल पंधरा महिन्यांनी सी आय डी ने अर्चना कुटे यांना पुण्यातून अटक केली. त्यांना न्याया-लयाने २८ सप्टेंबर पर्यंत कोठडी सु-नवली होती रविवारी त्यांना न्याया-लयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी वाढवून दिली.

## भाजपाचे ज्येष्ठ नेते नितीन नाईकनवरे संकट ग्रस्त शेतकऱ्यांच्या भेटीला

माजलगाव प्रतिनिधी सतत पडणाऱ्या धो धो पावसामुळे पुरुषोत्तम पुरी, गोविंदपुर, ढेपेगाव, सरवर पिंपळगाव, महातपुरी आधी गावात पूरग्रस्त स्थिती निर्माण झाल्याम ुळे शेतीच्या नुकसानी सह घरादाराचे हे नुकसान झाले आहे घरात ठेवलेलं पूर्ण धान्य पावसात भिजून गेले आहे तर काही ठिकाणी वाहून गेले आहे त्यामुळे अनेकांचे संसार उघडे पडलेले आहेत अशा संकट ग्रस्त शेतकरी गावकऱ्यांची आज भाजपाचे ज्येष्ठ नेते नितीन दादा नाईक नवरे यांनी भेट घेतली शासना कडून मदत करण्याचे आश्वासन देऊन शेतकरी गावकऱ्यांना दिलासा देत आहेत माजलगाव तालुक्या सह जिल्ह्यात गेल्या आठ दिवसापासून पावसाची सतत धार चालू आहे शेतीत पूर्णतः पाणी झाले आहे तर घराची मोठ्या प्रमाणात पडझड होऊन संसार उपयोगी वस्तूअन्नधान्य पूर्णपणे वाहून गेल्या याम ुळे अनेकांची संसार उघड्यावर पडले आहेत दुष्काळग्रस्त शेतकऱ्याचे पाहानी करण्यासाठी आणि पूरग्रस्त परिस्थितीच्या निवारण करण्यासाठी माजलगाव चे भाजपाचे ज्येष्ठ नेते नितीन दादा नाईकनवरे यांनी आज सकाळी पुरुषोत्तमपुरी देपेगाव, गोविंदपुर, सांडस चिंचोली, सरवर पिंपळगाव, महातपुरी आधी गावाची पाहणी केली पाणी दरम्यान गावातील



नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते गावकऱ्यांनी आपल्या शेतीतील नुकसानाचे आणि घरादारातील नुकसानाची व्यथा नाईकनवरे यांच्याकडे मांडली शेतीसह घराच्या खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे प्रतिक्रिया नितीन दादां नाईकनवरे यांनी बोलून दाखवली तसेच शासनाकडून जी सर्वोत्तपरी मदत करावी लागेल ती आम्ही करण्यास तयार आहोत त्यासाठी मी वाटेल ते करायला तयार आहे मात्र शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणार नाही असे सांगून शासनाने दुष्काळाचे सगळे निकष बाजूला ठेवून मुदत करण्याची तयारी दाखवली आहे त्यामुळे शेतकऱ्यांना घाबरून जाण्याची काहीच कारण नाही असे नितीन दादा नाईक नवरे यांनी सांगितले व शेतकऱ्यांना दिलासा दिला

# समाजातील सत्याला आवाज देणारा संपादक अभिजीत पवार

पत्रकारिता ही केवळ बातमी देण्याची कला नाही तर ती समाजातील सत्याला आवाज देण्याची जबाबदारी आहे. ही जबाबदारी निष्ठेने पार पाडणारे नाव म्हणजेच माऊली न्युज मिडिया चे संपादक अभिजीत पवार आहेत. अभिजीत पवार यांनी नेहमीच समाजातील उपेक्षितांचे प्रश्न मांडले, अन्यायाविरुद्ध निर्भयपणे लेखणी चालवली आणि ग्रामीण भागातील जनतेच्या अडचणी पुढे आणत खरी पत्रकारिता जिवंत ठेवली. त्यांच्या कार्यामुळे माऊली न्युज मिडिया हे व्यासपीठ जनतेच्या मनात विश्वास निर्माण करणारे ठरले आहे. प्रामाणिकपणा, धैर्य आणि सत्याशी निष्ठा हीच त्यांची खरी ताकद आहे. गेल्या मराठा आरक्षण लढ्यामध्ये माऊली न्यूज मिडिया ने अतिशय सुंदर कव्हरेज दिले आहे. अभिजीत पवार यांनी आपल्या कारकिर्दीत सदैव



सत्याला प्राधान्य दिले. बातमी कितीही कठीण असो किंवा विरोध कितीही प्रबळ असो, सत्य जनतेपर्यंत पोहोचवणे हाच त्यांचा ध्यास राहिला आहे. "पत्रकार हा समाजाचा आरसा असतो"

### माऊली न्युज मिडिया - जनतेचा विश्वास

अभिजीत पवार हे त्यांच्या संपादक पदाखाली माऊली न्युज मिडिया हे व्यासपीठ आज विश्वासार्हता, पारदर्शकता आणि सचोटीचे प्रतीक ठरले आहे. ग्रामीण भागातील छोट्या मोठ्या घटना, शेतकऱ्यांचे प्रश्न, तरुणांचे संघर्ष, महिलांचे हक्क यांसारख्या विषयांना त्यांनी अग्रक्रम दिला. यामुळे माऊली न्युज मिडिया हे नाव प्रत्येक वाचकांच्या मनात रुजले आहे.पत्रकारिता करताना समाजातील उपेक्षित घटकांना आवाज देणे, त्यांचे प्रश्न शासन दरबारी नेणे ही अभिजीत पवार यांची सर्वात मोठी ताकद आहे. "पत्रकार हा समाजाचा प्रहरी आहे" ही भावना जपून ते आजवर कार्यरत आहेत.

या तत्त्वावर ते ठाम राहून, सामाजिक प्रश्नांना प्रामाणिकपणे मांडण्याचे कार्य त्यांनी यशस्वीरीत्या केले आहे.आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त माऊली न्युज मिडिया परिवारासह असंख्य वाचक, चाहत्यांकडून आणि शुभेच्छुकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.पत्रकारिता ही केवळ बातम्या देण्यापुरती मर्यादित नसून समाजातील सत्य उलगडणे, उपेक्षितांच्या हक्कासाठी लढणे आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे ही तिची खरी ओळख आहे. ही ओळख जपत, ग्रामीण भागातील समस्यांना वाचा फोडत आणि सामान्य जनतेचा प्रश्न सत्ताधाऱ्यांपर्यंत पोहोचवत निडरपणे काम करणारे नाव म्हणजे माऊली न्युज मिडिया चे संपादक अभिजीत पवार आहेत.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com